## -:प्रेसनोट:-

## उपकार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्या, उप विभाग कार्यालय सिंदेवाही, येथील सहायक अभियंता, यांचे विरूध्द अॅन्टी करप्शन ब्युरो चंद्रपूरची कारवाई

उपकार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्या. उप विभाग कार्यालय सिंदेवाही, येथील सहायक अभियंता श्री. अमोद संतोष रंदये यांनी सोलर सिस्टीम बसवून दिलेल्या दोन ग्राहकांचे म.रा.वि.वि.कं. मर्या. च्या मीटरवर कनेक्शन जोडण्याचीं परवानगी असल्याबाबतचा रिलीज ऑर्डर काढुन देण्याचे कामाकरीता लाच रक्कमेची मागणी करून स्विकारल्याने अॅन्टी करप्शन ब्युरो चंद्रपूर यांचे पथकाने आज दिनांक ०१/०७/२०२६ रोजी कारवाई केली.

यातील आलोसे यांनी प्रधानमंत्री सुर्यघर योजनेअंतर्गत दोन ग्राहकांचे सोलर सिस्टीम बसवून दिल्याने म.रा.वि.वि.कं. मर्या. च्या मीटरवर कनेक्शन जोडण्याची परवानगी असल्याबाबतचा रिलीज ऑर्डर काढण्याकरीता प्रत्येक ग्राहकाचे दोन हजार या प्रमाणे एकूण ४,०००/- रु ची लाचेची मागणी केली. परंतु तक्रारदार यांना आरोपी श्री. अमोद संतोष रंदये, वय ३८ वर्ष, व्यवसाय- नोकरी, पद- सहायक अभियंता, उपकार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं. मर्या. उप विभाग, कार्यालय सिंदेवाही यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ०१/०७/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय चंद्रपुर येथे प्रत्यक्ष हजर येवुन तक्रार दिली.

तक्रारदार यांचे प्राप्त तक्रारीवरून दिनांक ०१/०७/२०२६ रोजी आरोपी श्री. अमोद संतोष रंदये, वय ३८ वर्ष, व्यवसाय- नोकरी, पद- सहायक अभियंता, उपकार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं. मर्या. उप विभाग, कार्यालय सिंदेवाही यांची पंचासमक्ष पडताळणी व सापळा कारवाई केली असता त्यांनी तक्रारदार यांना दोन ग्राहकांचे सोलर सिस्टीम बसवून दिल्याने म.रा.वि.वि.कं. मर्या. च्या मीटरवर कनेक्शन जोडण्याची परवानगी असल्याबाबतचा रिलीज ऑर्डर काढुन देण्याचे कामाकरीता ४,०००/- रूपये लाच रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती ३,००० स्वत: स्विकारले. श्री. अमोद संतोष रंदये यांना ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास कार्य सुरू आहे.

सदरची कार्यवाही डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, श्रीमती माधुरी बावीस्कर, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर यांचे मार्गदर्शनात श्री. अनिल जिट्टावार, पोलीस उपअधीक्षक, पोलीस निरीक्षक प्रशांत केदार व सापळा पथक पो.हवा. हिवराज नेवारे, रविकांत इंगळे, पो.शि. अमोल सिडाम, राकेश जांभुळकर, प्रदिप ताडाम, महेश माहुरपवार, सचिन गजभिये, म.पो.शि. मेघा मोहुर्ले, चापोशि/सतिश सिडाम सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर व चापोशि/संदिप कौरासे, मो.प.वि. चंद्रपूर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजेंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ आमचेशी संपर्क साधावा.

## लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर

श्री अनिल जिट्टावार, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :- ९८२३२७०५८१
श्री. प्रशांत केदार, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :- ८७८८७२३७६५

**Toll Free No. 1064** **Phone No. : 07172-250251** **Mob. No. 8379951064**
**Email: acbchandrapur@gmail.com** **Website: www.acbmaharashtra.gov.in**

( अनिल जिट्टावार )
पोलीसउपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर